21 FEB 2008

27160

**तात्काळ**

प्रति,
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री,
चर्नी रोड, मुंबई.

क्रमांक : आरटीआर-०३९९/प्र.क्र.५९८/पोल-५अ

गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ फेब्रुवारी, २००८.

विषय :- मोफ्युसिल लिपिक संवर्गातील प्रमुख लिपिक व वरिष्ठ श्रेणी लिपिक या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करणेबाबत.

महोदय,

पोलीस विभागातील मोफ्युसिल लिपिक संवर्गातील प्रमुख लिपिक व वरिष्ठ श्रेणी लिपिक या पदांचे एकत्रित सेवाप्रवेश नियम आदेश क्रमांक आरटीआर-०३९९/प्र.क्र.५९८/पोल-५अ, दि. १६ फेब्रुवारी, २००८ अन्वये विहीत करण्यात आले आहे. सोबत सेवाप्रवेश नियमाची इंग्रजी व मराठीतील प्रत जोडली आहे. सदर शासन आदेश राजपत्रात भाग-४ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी २०० प्रती या विभागास व खालीलप्रमाणे कार्यालयास कंसात नमूद केलेल्या प्रती पाठवाव्यात, ही विनंती.

सोबत :- मोफ्युसिल लिपिक संवर्गातील प्रमुख लिपिक व वरिष्ठ श्रेणी लिपिक या पदाचे एकत्रित सेवाप्रवेश नियम

आपला,

( प्र.ता.गोंड )
सह सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग

प्रत

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रत्येकी १० प्रती)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (प्रत्येकी २ प्रती)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रत्येकी २ प्रती)
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक, (प्रत्येकी २ प्रती)
सर्व पोलीस आयुक्त, (प्रत्येकी १ प्रत)
सर्व पोलीस अधीक्षक, (प्रत्येकी १ प्रत)
सामान्य प्रशासन विभाग (कार्या-१२), मंत्रालय, मुंबई. (प्रत्येकी १ प्रत)
[illegible] मंत्रालय, मुंबई (प्रत्येकी १ प्रत)

1644
17 3, 23

## NOTIFICATION

Home Department,
Mantralaya, Mumbai 400 032.
Dated the 16th February,2008

Constitution of India

No. RTR 0399/CR-598 (Part-II)/Pol 5 A - In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating the recruitment to the post of Head Clerk Group C, and Senior Grade Clerk, Group-C of Mofussil Clerical Cadre, in the Police Department under administrative control of the Home Department of the Government of Maharashtra, namely :-

1. These rules may be called the Head Clerk, Group C, and Senior Grade Clerk, Group-C, of Mofussil Cadre in the Police Department (Recruitment) Rules, 2007.

2. In these rules, unless the context requires otherwise,-

(a) **'Department'** means the Home Department of the Government;

(b) **'Government'** means the Government of Maharashtra.

3 Appointment to the post of Head Clerk, Group-C of Mofussil Cadre in the Police Department shall be made by promotion of a suitable person on the basis of seniority, subject to fitness from amongst the persons holding the post of Senior Grade Clerk, Group A, in the Mofussil Cadre, having not less than three years regular service in that cadre and have either passed the Departmental Supervisory Examination or exempted from passing the examination on attaining the age of forty five years.

4. Appointment to the post of Senior Grade Clerk, Group-C of Mofussil Cadre in the Police Department shall be made by promotion of a suitable person on the basis of seniority, subject to fitness from amongst the persons holding the post of Clerk-cum-Typist, Group C in the Mofussil Cadre, and having completed not less than three years of regular service in that cadre and have either passed the Departmental Post - Recruitment Examination or exempted from passing the examination on attaining the age of forty five years.

5. A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 shall be required to pass the examinations in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing, those examinations.

6. A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 should posses a certificate in computer operation as may be prescribed by the Directorate of Information and Technology, Government of Maharashtra, from time to time.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra or in mofussil cadre. Similarly, a person appointed to the post mentioned in rule 4 shall be liable for transfer anywhere within the range or mofussil cadre.

**By order and in the names of the**
**Governor of Maharashtra,**

**( P.T. Goud )**
**Joint Secretary to Government.**

1645
27
(12)

<u>अधिसूचना</u>

गृह विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक:-१६ फेब्रुवारी,२००८

क्र.आरटीआर-०३९९/प्र.क्र.५९८(भाग-२)/पोल-५अभारतीयसंविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करत आणि यासंबधीचे सर्व अस्तित्वात असलेले नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र राज्याच्या गृह विभाग यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील पोलीस विभागातील ग्रामीण (मोफ्युसिल) लिपिक संवर्गातील प्रमुख लिपिक गट- क आणि वरिष्ठ श्रेणी लिपिक गट-क या पदाच्या भरतीचे विनियमित करणारे नियम तयार केले आहेत.

१. सदर नियमांना पोलीस विभागांतील ग्रामीण (मोफ्युसिल) संवर्गातील प्रमुख लिपिक गट-क आणि वरीष्ठ श्रेणी लिपिक गट-क पदांचे (सेवाप्रवेश) नियम २००७ असे संबोधण्यात यावे.

२. सदर नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर-

अ) "विभाग" म्हणजे शासनाचा गृह विभाग

ब) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन

३. पोलीस विभागातील प्रमुख लिपिक, गट-क ग्रामीण संवर्गातील पदी नेमणूक, वरीष्ठ श्रेणी लिपिक, गट-क या ग्रामीण संवर्गातील पदी या संवर्गात ३ वर्षांपेक्षा कमी नियमित सेवा नसलेल्या आणि विभागीय पर्यवेक्षकीय परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा वय ४५ वर्षे पुर्ण झाल्यामुळे परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेल्या अशा लायक व्यक्तीमधून ज्येष्ठतेच्या आधारावर करता येईल.

४.	पोलीस विभागातील वरिष्ठ श्रेणी लिपिक, गट-क या ग्रामीण संवर्गातील पदी नेमणूक, लिपिक एवं टंकलेखक गट-क या ग्रामीण संवर्गातील पदी या संवर्गात ३ वर्षाहून कमी नियमित सेवा नसलेला आणि विभागीय सेवाप्रवेशात्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा वय ४५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेल्या अशा लायक व्यक्तीमधून ज्येष्ठतेच्या आधारावर करता येईल.

५.	नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने अगोदरच हिंदी व मराठी परीक्षा उत्तीर्ण झाली नसल्यास किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६.	नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि तंत्रज्ञान संचालनालयाने यांनी वेळोवेळी विहित केलेल्या संगणक चलन (कॉम्प्युटर ऑपरेशन) हाताळणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७.	नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात किंवा ग्रामीण (मोफ्युसिल) वर्गात कोठेही बदली होण्यास पात्र होईल. तसेच नियम ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती परिक्षेत्रामध्ये कोठेही किंवा ग्रामीण (मोफ्युसिल) संवर्गात बदली होण्यास अधीन राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( प्र. ता. गोंड )
शासनाचे सह सचिव